## नियमीत दरखास्त क्र. ०४/२०२२ मध्ये निशाणी क्र.१३ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णीत धनकोतर्फे ऋणको क्र. १ड व १इ यांच्या नावामध्ये व पत्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. न्यायनिर्णीत धनको यांच्या प्रस्तुत कथनानुसार ऋणको क्र. १ड व १इ यांचा विवाह झालेला असुन त्यांचा पत्ता व लग्नानंतरचे नाव बदलले आहे. त्यामुळे ऋणको क्र. १ड व १इ यांच्या नावात व पत्यामध्ये दुरुस्ती करण्याची आहे.

२) प्रस्तुत अर्जाच्या कामी न्यायनिर्णीत धनको यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

३) प्रकरणाचे स्वरूप विचारात घेता व अर्जातीत नमूद कारणांचा विचार करता माझ्या मते न्यायनिर्णीत धनको यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२) न्यायनिर्णीत धनको यांनी प्रस्तुत अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती दरखास्तच्या टायटल क्लॉजमध्ये या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत करावी व त्यानंतर दुरुस्त दरखास्तची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2023.06.14 17:44:59 +0530

दिनांकः–१४/०६/२०२३ (पां.लिं.घुले)

ठिकाणः– दारव्हा दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,दारव्हा.